# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी
क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ३८/२०२५ दिनांक २६/०१/२०२५

**प्रेस नोट**

## अनाधिकृतरित्या काशिमिरा पोलीस ठाण्याचे हद्दीत वास्तव्यास असलेल्या एका बांगलादेशी महिला नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २५/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत काशिमीरा पोलीस ठाण्याचे हद्दीतील कंपनी गेट नं. ०१, पेनकरपाडा, काशिमीरा, ता. जि. ठाणे या ठिकाणी बांग्लादेशी नागरीक विनापरवाना कामासाठी येत असल्याची बातमी मिळाली असून ते विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी दुपारच्या सुमारास साफळा रचुन ०१ महिला बांगलादेशी नागरीकांस महिला पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत, तिने बांगलादेशी नागरीक असल्याची कबुली दिल्याने सदरबाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे यांनी सविस्तर पंचनामा केला असुन ताब्यात घेतलेल्या महिला बांगलादेशी नागरीकाविरुध्द काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ३५/२०२५ असे एकुण ०३ बांगलादेशी नागरीकाविरुध्द फिर्याद दिल्याने पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४-अ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पोशि/केशव शिंदे, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर तसेच मपोशि/२३६३९ स्नेहल पुणे, नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांनी केली आहे.

-----------------------------oo---------------------------